







सेवावर्धिनी





# सेवावार्ता

अंक ४

२०२५-२६

सेवावर्धिनी - एक विश्वासार्ह सहकारी

# अनुक्रमणिका


१. मनोगत

२. सामाजिक संस्था आणि त्यांचे कार्य -

२.१ लोकविकास फाउंडेशन - वस्तीतील स्वप्नांना नवी उभारी

२.२ निमाड अभ्युदय ग्रामीण व्यवस्थापन व विकास संस्था (NARMADA)

३. उपजीविकेचे साधन -

३.१ मुळेवाडी मॉडेल - 'बायोगॅस' क्रांती

३.२ अटल ऊर्जा बायोगॅस प्रकल्प

४. सामाजिक संस्थांसाठी महत्वाचे

४.१ लोक सहभागीय ग्रामीण मुल्यावलोकन (PRA)

५. सेवाव्रती -

५.१ मीरा बडवे - निवांतचा प्रकाशमार्ग....!

५.२ पद्मजा गोडबोले - स्वमग्न मुलांची 'प्रसन्न' धडपड...

६. सेवा वार्ता -

६.१ सेवा है यज्ञकुंड सेवातरंग २०२६ आढावा

# मनोगत

नमस्कार!

सेवावार्ताच्या चौथ्या अंकात आपणांस पुन्हा एकदा विविध प्रेरणादायी सेवा संस्थांची ओळख करून देताना आम्हाला आनंद होत आहे. शहरी तसेच दुर्गम भागांमध्ये कार्यरत असलेल्या या संस्थांचे यशस्वी उपक्रम आपल्या कार्यक्षेत्रातील सेवा-संधी ओळखण्यास आणि त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यास निश्चितच प्रेरणा देतील.

आजच्या काळात इंधनाचा प्रश्न प्रत्येकाच्या जीवनाला विविध स्वरूपांत स्पर्श करत आहे. या समस्येवर परिणामकारक आणि पर्यावरणपूरक उपाय म्हणून बायोगॅस प्रकल्प अत्यंत उपयुक्त ठरू शकतात. ज्या ठिकाणी शक्य असेल, तेथे अशा प्रकल्पांची तातडीने उभारणी होणे ही काळाची गरज आहे. विशेष म्हणजे, या प्रकल्पांमधून होणारी दीर्घकालीन बचत लक्षात घेतली तर बाह्य आर्थिक सहाय्याशिवायही ते सहज उभे राहू शकतात.

याचबरोबर , लोकसहभागीय ग्रामीण मुल्यांकन (Participatory Rural Appraisal) या प्रभावी साधनाविषयीची माहिती आपल्या कार्यक्षेत्रातील अत्यावश्यक विकासकामांचा अग्रक्रम ठरविण्यास , त्यांची उद्दिष्टे निश्चित करण्यास आणि लोकसहभागातून ती याशाविरीत्या पूर्ण करण्यास उपयुक्त ठरेल. या विषयावर लवकरच प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्याचा आमचा मानस आहे.

अनेकदा एखाद्या छोट्याशा प्रसंगातून सुरू झालेले सामाजिक कार्य पुढे व्यापक चळवळीत रूपांतरित होते. विशेष मुलांचे संगोपन हा समाजात तुलनेने दुर्लक्षित विषय असला, तरी त्यातून मार्ग शोधत उभा राहिलेला प्रेरणादायी प्रवास मनाला स्पर्शून जातो आणि नव्या दृष्टीकोनाची जाणीव करून देतो.

गतवर्षी सुरू केलेला संस्थामूल्यांकन हा उपक्रम यंदाही नव्या जोमाने सुरू करण्यात आला आहे. नवीन नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असून, आपण सर्वांनी आमच्याशी संपर्क साधून या उपक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा, ही नम्र विनंती.

॥ एकमेका सहाय्य करू । अवघे धरू सुपंथ ॥

**- श्री. विक्रम पंडित**
**कार्यकारिणी सदस्य,**
**सेवावर्धिनी.**

# २. सामाजिक संस्था आणि त्यांचे कार्य

## २.१ - लोकविकास फाउंडेशन

## वस्तीतील स्वप्नांना नवी उभारी



पुणे हे शिक्षणाचे आणि संस्कृतीचे माहेरघर मानले जाते. मात्र, या शहरात अशा अनेक वस्त्या आहेत, जिथे राहणाऱ्या मुलांच्या स्वप्नांना योग्य दिशा आणि संधीची प्रतीक्षा आहे. "व्यक्ती विकासातून राष्ट्र निर्माण" हे ब्रीदवाक्य घेऊन पुण्याच्या 'लोकविकास सोशल फाउंडेशन'ने गेल्या काही वर्षांपासून या वस्त्यांमध्ये परिवर्तनाची एक नवी पहाट आणली आहे. समाजातील वंचित आणि उपेक्षित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ही संस्था एक आधारस्तंभ ठरत आहे.

लोकविकास सोशल फाउंडेशनचे कार्य प्रामुख्याने बालविकास आणि महिला सक्षमीकरणावर केंद्रित आहे. शिवाजीनगर, गोखलेनगर, औंध, बोपोडी, पाषाण, बाणेर-बालेवाडी अशा पुणे विद्यापीठ परिसरातील सुमारे ६३ सेवावस्त्यांमध्ये संस्थेचे कार्य विस्तारलेले आहे. आरोग्य, शिक्षण, संस्कार आणि स्वावलंबन या चतुःसूत्रीवर आधारित हे सेवाकार्य आज ९६ वेगवेगळ्या उपक्रमांच्या माध्यमातून घराघरांत पोहोचले आहे.

वस्तीतील मुलांकडे गुणवत्ता असते, कष्ट करण्याची तयारी असते, पण त्यांच्याकडे अनेकदा पोषक वातावरणाचा अभाव असतो. हीच उणीव 'बालउन्नती प्रकल्पा'द्वारे भरून काढली जाते. घर लहान असल्याने अनेक ठिकाणी अभ्यासाला जागा नसते आणि पालक कामाच्या व्यापात असल्याने मुलांना पुरेसा वेळ देऊ शकत नाहीत. अशा वेळी हे बालउन्नती वर्ग मुलांसाठी हक्काची जागा बनले.

पुस्तकी ज्ञानासोबतच खेळ, गाणी, गोष्टी आणि मेडीटेशनच्या माध्यमातून मुलांचे व्यक्तिमत्त्व घडविले जाते. भारतीय सण-उत्सव, थोर महापुरुषांचे विचार आणि राष्ट्रभक्तीचे संस्कार यामुळे मुलांमध्ये शिस्त, आत्मविश्वास आणि संघवृत्ती निर्माण होते. आज वस्तीतील लहान मुले स्क्रीन टाइम सोडून मैदानी खेळ आणि सृजनशील कामात रमू लागली आहेत, हे या प्रकल्पाचे मोठे यश आहे.

संस्कारासोबत शैक्षणिक प्रगतीही तितकीच महत्त्वाची आहे. हे लक्षात घेऊन संस्थेच्या 'अभ्यासिका प्रकल्पा'ने वस्तीतील मुलांची शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यावर भर दिला आहे. 'स्मार्ट अभ्यासिका कीट'च्या मदतीने वाचन, लेखन आणि गणितातील क्रिया मुले आनंदाने शिकत आहेत. ताईंचे (शिक्षिकांचे) योग्य मार्गदर्शन आणि यशस्वी व्यक्तींशी होणारा संवाद यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण झाली आहे.

विशेष म्हणजे, बदलत्या काळाची गरज ओळखून तांत्रिक कौशल्य आत्मसात करून वस्तीतील तरुण स्वावलंबी व्हावेत, या हेतूने संस्थेने 'ड्रोन रिपेअर अँड मेंटेनन्स ट्रेनिंग सेंटर' सुध्दा सुरू केले आहे.

१२ ते १८ वयोगटातील मुलींच्या ऊर्जेला योग्य दिशा देणे गरजेचे असते. 'किशोरी विकास प्रकल्पा'च्या माध्यमातून मुलींना शारीरिक-मानसिक बदलांची शास्त्रीय माहिती दिली जाते. मैत्रीपूर्ण वातावरणात होणाऱ्या चर्चा, सहली आणि व्याख्यानांमुळे या मुलींचे मनोबल उंचावले आहे.

तर 'महिला उद्योग व प्रशिक्षण केंद्रा'च्या माध्यमातून वस्तीतील महिलांना स्वयंरोजगाराचे धडे दिले जातात. कौशल्यावर आधारित प्रशिक्षण मिळाल्यामुळे अनेक महिला आज स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या आहेत. महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य त्यांच्या कुटुंबाचा आधार बनले आहे.

वस्तीतील जीवनात काहींच्या जीवनात ताण-तणाव आणि नैराश्याचे सावट असल्याचे लक्षात आले. अशा व्यक्तींना आधार देण्यासाठी संस्थेचे 'समुपदेशन केंद्र' कार्यरत आहे. नकारात्मक विचार, भीती किंवा कौटुंबिक समस्यांनी ग्रासलेल्या व्यक्तींना येथे तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळते. समस्याग्रस्त व्यक्तीला स्वतःच्याच मदतीने सक्षम करणे, हे या केंद्राचे वैशिष्ट्य आहे.

या संपूर्ण प्रकल्पाचे यश इथे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये दडलेले आहे. संस्थेने वस्तीतीलच सुशिक्षित तरुणांना या कार्यात सहभागी करून घेतले आहे. ७५ हून अधिक कार्यकर्ते दरमहा प्रशिक्षण घेऊन हे सेवाकार्य निष्ठेने चालवत आहेत. विशेष आनंदाची गोष्ट म्हणजे, पूर्वी विद्यार्थी म्हणून वर्गाला येणाऱ्या विद्यार्थिनी आज स्वतः पदवीधर होऊन याच केंद्रांमध्ये शिक्षिका म्हणून काम पाहत आहेत. हीच  या संस्थेच्या कार्यातील जमेची बाजू आहे.

लोकविकास सोशल फाउंडेशनने लावलेले हे रोपटे आता वटवृक्ष होऊ लागले आहे. शिवराज्याभिषेक दिन असो वा विज्ञान दिन, प्रत्येक उपक्रम मुलांच्या डोळ्यांत नवी चमक घेऊन येतो. शालेय साहित्याचे वाटप, हिवाळी शिबिरे आणि वार्षिक स्नेहसंमेलने यांमुळे वस्तीतील वातावरण चैतन्यमय झाले आहे.

हे कार्य अधिक सक्षम करण्यासाठी समाजाच्या मदतीची गरज आहे. आपणही आपल्या आनंदाचे क्षण या मुलांसोबत साजरे करू शकता. एखादा उपक्रम किंवा वस्ती दत्तक घेऊन, स्वतःचा वेळ देऊन किंवा आर्थिक साहाय्य करून आपण या यज्ञामध्ये आपली समिधा अर्पण करू शकता. लोकविकास सोशल फाउंडेशनचा वस्तीतील मुलांच्या स्वप्नांना बळ देणारा हा  'सेवाप्रवास' जाणून घेऊया. 'व्यक्ती विकासातून राष्ट्र निर्माण' करण्याच्या या पवित्र कार्यात आपणही खारीचा वाटा उचलूया.

संपर्क - अरुण निमकर्डे - 90210 18572





# (ग्रामीण-आदिवासी भागाचा शाश्वत विकास)

## २.२. निमाड अभ्युदय ग्रामीण व्यवस्थापन व विकास संस्था (NARMADA)

आदिवासी आणि ग्रामीण भागाचा विकास, विशेषतः शैक्षणिक तसेच महिलांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी कार्य करण्याच्या उद्देशाने निमाड अभ्युदय ग्रामीण व्यवस्थापन व विकास संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. या संस्थेच्यावतीने विविध योजनांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विकासाचा महामार्ग प्रशस्त केला जात आहे.

### संस्थेचा परिचय

निमाड अभ्युदय ग्रामीण व्यवस्थापन व विकास संस्थेची स्थापना २०१०मध्ये भारती ठाकुर यांनी केली. मध्यप्रदेशातील पवित्र नर्मदा नदीची परिक्रमा पूर्ण केल्यानंतर त्यांनी या संस्थेची मुहुर्तमेढ रोवली. या संस्थेचा मुख्य उद्देश ग्रामीण व आदिवासी समाजाचा सर्वांगीण विकास साधणे हा आहे. संस्था शिक्षण, कौशल्य विकास, आरोग्य, महिला सक्षमीकरण आणि शाश्वत उपजीविका या क्षेत्रांत संस्था कार्यरत आहे.

### दृष्टिकोन

- गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा प्रसार व जनजागृती वाढविणे.
- महिलांना शिक्षण व उपजीविकेच्या माध्यमातून सक्षम बनविणे.
- महिला व मुलांमध्ये नेतृत्वगुण विकसित करणे.
- समुहाच्या सहभागाला प्रोत्साहन देणे.
- शाश्वत व स्वावलंबी उपजीविका प्रणाली उभारणे.





### ध्येय

- शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आणि कौशल्य विकास क्षेत्रांत दीर्घकालीन प्रकल्प राबविणे.
- जनजागृतीसाठी विविध मोहिमा व कार्यशाळांचे आयोजन करणे.
- रोजगाराभिमुख शिक्षण संधी उपलब्ध करून देणे.
- शाश्वत ग्रामीण विकासाचे आदर्श मॉडेल विकसित करणे.

### मुख्य उपक्रम

नर्मदा कौशल्य रथ (स्किल्स ऑन व्हील्स)

- ग्रामीण व दुर्गम आदिवासी भागांमध्ये कौशल्य प्रशिक्षणाची कमतरता भरून काढण्यासाठी मोबाइल प्रशिक्षण युनिट.
- हा रथ गावोगावी जाऊन प्लंबिंग, सुतारकाम, इलेक्ट्रिकल, फॅब्रिकेशन व मिस्त्रीकाम यांसारख्या व्यावहारिक कौशल्यांचे प्रशिक्षण देतो.
- रथात जनरेटरची सुविधा असल्यामुळे वीज उपलब्ध नसतानाही प्रशिक्षण विनाव्यत्यय सुरू ठेवता येते.

आतापर्यंत १ हजार ५०० हून अधिक युवकांना प्रशिक्षण.





### विवेकानंद ग्रामीण तंत्रज्ञान संस्था (VIRT)

- मे २०२२ मध्ये स्थापन झालेली ही संस्था ग्रामीण युवकांना कौशल्याधारित शिक्षण देते.
- येथे डीबीआरटी (डिप्लोमा इन बेसिक रूरल टेक्नोलॉजी) सारखे अभ्यासक्रम राबविले जातात.

### अधिक माहितीसाठी

**संस्थेचा पत्ता :** १४९, नर्मदालय, लेपा पुनर्वसन, जिल्हा खरगोन, मध्यप्रदेश – ४५१२२८

**संपर्क :** +९१ ९५७५७ ५६१४१

**ईमेल:** narmadalaya@gmail.com

**वेबसाइट:** www.narmadalaya.org





# ३. उपजीविकेचे साधन

## ३.१ मुळेवाडी मॉडेल - 'बायोगॅस' क्रांती



कोणत्याही सामाजिक कार्याचा कणा आर्थिक सहकार्य आणि तो समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणारे शाश्वत बदल हा असतो. मुळेवाडी (जि. अहिल्यानगर) येथील 'श्री दत्त योगीराज बहुउद्देशीय सामाजिक संस्था' ही अशाच बदलांची साक्ष देणारी दीपस्तंभ. अनाथ मुले आणि ऊसतोड कामगारांच्या पाल्यांच्या आयुष्यात ज्ञानाचा प्रकाश पेरणाऱ्या या संस्थेने आता 'सुयश सोल्युशन्स' आणि 'सेवावर्धिनी'च्या सहकार्याने पर्यावरणाशी मैत्री करत आर्थिक बचतीचा नवा आदर्श उभा केला आहे.

मुळेवाडीतील या संस्थेमध्ये सध्या २५० हून अधिक मुले-मुली वास्तव्यास आहेत. ज्यांच्या पालकांच्या आयुष्यात ऊसतोडीचे कष्ट पाचवीला पुजलेले आहेत अशी ही मुले आहेत. परिस्थितीने या मुलांना पोरके केले आहे. या २५० मुला-मुलींच्या दोन वेळच्या जेवणाची सुविधा करणे संस्थेसाठी मोठे आव्हान होते. अन्नासाठी लागणारे इंधन हा कळीचा मुद्दा होता. दरमहा सुमारे ८ व्यावसायिक गॅस सिलेंडरची गरज भासत होती. गॅसचे वाढते दर आणि या मुलांच्या गरजा यांचा मेळ घालताना संस्थेची दमछाक होत होती.

अशा परिस्थितीत 'सुयश सोल्युशन्स'च्या माध्यमातून एक कल्पक मार्ग समोर आला 'बायोगॅस प्रकल्प'. सेवावर्धिनीच्या मार्गदर्शनाखाली मुळेवाडी येथे ४ बायोगॅस युनिट्स कार्यान्वित करण्यात आले. दिसायला ही केवळ यंत्रणा वाटल असली तरी, हे प्रत्यक्षात संस्थेसाठी वरदान ठरले.

महिन्याला ८ सिलेंडर लागत होते, तिथे आता केवळ १ सिलेंडर वर काम भागत आहे. ७ सिलेंडरची होणारी बचत मोलाची ठरली. त्यातून आवश्यक निधी मुलांच्या शिक्षण आणि आरोग्यासाठी वापरला जात आहे. चुलीचा धूर किंवा महागड्या गॅसवर अवलंबून राहण्यापेक्षा, टाकाऊ पदार्थापासून तयार होणारा बायोगॅस हा सुरक्षित आणि प्रदूषणमुक्त पर्याय ठरला आहे. संस्थेच्या परिसरात उपलब्ध असलेल्या साधनांचा वापर करून ऊर्जा निर्मिती करणे, हा स्वावलंबनाचा उत्तम वस्तुपाठ संस्थेतील मुलांसमोर उभा राहिला आहे.

यंत्रासोबतच या संस्थेला सेवावर्धिनीचे सूक्ष्म नियोजन आणि सातत्यपूर्ण पाठबळ आहे. ग्रामीण भागातील जीवनमान सुधारण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर कसा प्रभावीपणे करता येतो, याचे हे ज्वलंत उदाहरण आहे.

मुळेवाडीचा बायोगॅस प्रकल्प मानवी संवेदना आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा सुरेख संगम आहे. ऊसतोड कामगारांची मुले उद्याचे स्वप्न पाहत आहेत, तिथे त्यांच्या स्वप्नांना बळ देण्यासाठी अशा प्रकल्पांची गरज आहे. 'नवकल्पना', 'सहकार्य' आणि 'सेवाभाव' एकत्र आले की काय जादू घडू शकते, हे या यशोगाथेने सिध्द केले आहे. मुळेवाडीचा हा प्रवास आता एका संस्थेपुरता मर्यादित न राहता, संपूर्ण समाजासाठी मार्गदर्शक ठरत आहे.





२५० मुलांच्या जेवणाचा प्रश्न असतो, तेव्हा प्रत्येक रुपया महत्त्वाचा असतो. बायोगॅसमुळे आमचा इंधनावरील खर्च जवळपास ८० टक्क्यांनी कमी झाला आहे. ही बचत आमच्या मुलांच्या उज्वल भविष्यासाठी एक मोठी गुंतवणूक ठरत आहे. सुयश सोल्युशन्स आणि सेवावर्धिनीचे आम्ही मनापासून ऋणी आहोत.

**- संस्थेचे पदाधिकारी.**

## ३.२ अटल ऊर्जा बायोगॅस प्रकल्प - पळसखेल (ता. आटपाडी, जि. सांगली) ऊर्जा शाश्वतता




पळसखेल (ता. आटपाडी , जि. सांगली ) हे दुष्काळी गाव . २०१५ पासून 'सेवावर्धिनी च्या सहकार्याने शाश्वत विकासाच्या दिशेने गावाने वाटचाल केली आहे. पळसखेलला उर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्यासाठी 'बायोगॅस प्रकल्प' आदर्श उदाहरण आहे. या योजनेंतर्गत आतापर्यंत २० बायोगॅस प्लॅन्टस् चे काम पूर्ण झाले असून २० प्लॅन्टस् च्या कामाचे पुढील नियोजन सुरू आहे. शेती आणि पशुपालनातून मिळणाऱ्या सेंद्रिय कचऱ्याचा वापर करून स्वच्छ आणि नूतनीकरणक्षम ऊर्जा निर्माण केली जाते. हा प्रकल्प केंद्र सरकारच्या
'गोबर्धन' (Gobardhan) योजनेला पूरक असून, यामुळे ग्रामीण भागातील कचरा व्यवस्थापन, प्रदूषण नियंत्रण आणि सेंद्रिय शेतीला चालना मिळाली आहे.

### परिवर्तनाची पहाट

पळसखेल हे सांगलीपासून सुमारे शंभर किलोमीटर अंतरावरील कमी पर्जन्यमान असलेले गाव आहे. वारंवार येणारा दुष्काळ आणि खडतर भौगोलिक परिस्थिती असूनही, येथील तरुण आणि ग्रामस्थांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार केला आहे. गावात पशुधनाची संख्या मोठी असल्याने बायोगॅससाठी लागणारा कच्चा माल (शेण/कचरा) मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे.

अनेक कुटुंबं महागड्या एलपीजी किंवा आरोग्यास घातक असलेल्या सरपणावर अवलंबून होती. बायोगॅसमुळे मात्र आरोग्यरक्षण आणि आर्थिक फायदे सध्या मिळत आहेत.

### यामध्ये प्रामुख्याने

- महिलांचे धुरापासून संरक्षण होत आहे.
- इंधनावरील खर्चामध्ये बचत होत आहे.
- बायोगॅसचे स्लरी (उत्कृष्ट सेंद्रिय खत) शेतीसाठी उपलब्ध झाले आहे.

### प्रकल्पाची उद्दिष्टपूर्ती

- ऊर्जा आत्मनिर्भरता - गावातील उर्वरित घरांसाठी बायोगॅस बसवण्याचे काम पूर्णत्वाच्या मार्गावर आहे.

- शाश्वत शेती - रासायनिक खतांचा वापर कमी करून बायोगॅस स्लरीचा वापर वाढला आहे.
- आरोग्य सुधार - घरातील हवेचे प्रदूषण कमी झाले आहे. महिला व मुलांचे श्वसनाचे आजार कमी झाले आहेत.
- आर्थिक बचत - कुटुंबाचा इंधनावर होणारा दरमहा ८०० ते १००० रुपयांचा खर्च वाचला आहे.

### योजनेचा परिणाम

- पर्यावरण - दररोज १ हजार किलोपेक्षा जास्त शेण कचऱ्याचे शुद्ध ऊर्जेत रूपांतर. हरितगृह वायू उत्सर्जनात घट.
- आरोग्य - धूरमुक्त स्वयंपाकघरामुळे महिलांच्या आरोग्यात सुधारणा.
- शेती - सेंद्रिय स्लरीमुळे जमिनीचा पोत सुधारून पीक उत्पादनात वाढ.
- सामाजिक - ५० हून अधिक युवक आणि महिलांना तंत्रज्ञान हाताळणीचे प्रशिक्षण, ज्यामुळे स्थानिक पातळीवर कौशल्य विकास.

### प्रस्तावित उपाययोजना

प्रकल्प दोन टप्प्यात (१२ महिने) राबवला जाईल.

- टप्पा १ (१-६ महिने) - बेसलाईन सर्व्हे, लाभार्थी निवड, पशुधन मूल्यांकन, साहित्य खरेदी आणि ४० युनिट्सची टप्प्याटप्प्याने स्थापना.
- टप्पा २ (७-१२ महिने) - तांत्रिक देखरेख, दुरुस्ती प्रशिक्षण, 'ग्राम बायोगॅस समिती'ची स्थापना आणि प्रकल्पाच्या यशोगाथाचे दस्तऐवजीकरण.

### अंदाजित खर्च -

२४ लाख १८ हजार रुपये अंदाजित खर्च असलेल्या या प्रकल्पामुळे पळसखेल हे ग्रामीण भारतातील 'ऊर्जा-शाश्वत' मॉडेल म्हणून उदयास आले आहे.

### प्रकल्पाच्या यशाचे मोजमाप करण्यासाठीचे निकष

- ९५ टक्क्यांपेक्षा जास्त युनिट्सची यशस्वी कार्यक्षमता.
- लाकूड फाट्याचा वापर १०० टक्के बंद होणे.
- कुटुंबाच्या मासिक खर्चात किमान ८०० रुपयांची बचत.
- 'ग्राम बायोगॅस समिती'च्या माध्यमातून प्रकल्पाचे सातत्य राखणे.

### सेवावर्धिनीची भूमिका

सेवावर्धिनीकडे सुमारे २५ वर्षांचा ग्रामीण विकासाचा अनुभव आहे. पळसखेलमध्ये यापूर्वी 'जलदूत' प्रकल्पाद्वारे पाणी टंचाईवर मात करण्यासाठी यशस्वीरित्या काम केले आहे. या प्रकल्पासाठी तांत्रिक मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि पारदर्शक अंमलबजावणीसाठी सेवावर्धिनी पूर्णपणे कटिबद्ध आहे.

### संपर्क माहिती -

**Office No -** 87675 29417

**Mail ID -** contact@sevavardhini.org

# ४ . सामाजिक संस्थांसाठी महत्वाचे -

## ४.१ - लोकसहभागीय ग्रामीण मुल्यावलोकन (PRA) -



**ग्रामीण विकासाचे शाश्वत सूत्र, गावचा विकास, गावचा सहभाग- प्रगतीची नवी लोकशाही वाटचाल**

गावाचा विकास म्हणजे केवळ सिमेंटचे रस्ते, उंच पाण्याच्या टाक्या किंवा काँक्रीटच्या इमारती नव्हेत, तर गावातील शेवटच्या माणसाच्या आयुष्यात झालेला सकारात्मक बदल होय. हा बदल तेव्हाच शक्य होतो जेव्हा विकासाची सूत्रे प्रत्यक्ष गावकऱ्यांच्या हातात असतात. 'लोकसहभागीय ग्रामीण मूल्यावलोकन' म्हणजेच पी.आर.ए. **(Participatory Rural Appraisal)** हे याच लोकशाही विचाराचे एक अत्यंत प्रभावी साधन आहे. "आमचं गाव, आमचा विकास" घोषणा न राहता ती एक कृती बनावी, यासाठी पी.आर.ए. ही संकल्पना महत्त्वाची आहे. भारताच्या इतिहासातही पूर्वीच्या राजांनी प्रजेच्या सहभागातून राज्य चालविण्यासाठी अशा तंत्रांचा वापर केल्याचे पुरावे सापडतात.

प्रत्येक गावाची एक वेगळी संस्कृती, तिथली भौगोलिक रचना, मातीचा पोत आणि स्थानिक नागरिकांच्या गरजा वेगवेगळ्या असू शकतात. एखादी सरकारी यंत्रणा किंवा त्या क्षेत्रातील तज्ज्ञ गावाला वरवरचे उपाय सुचवू शकतात, पण गावातील प्रश्नांची नेमकी नस केवळ तिथे पिढ्यानपिढ्या राहणाऱ्या माणसालाच ठाऊक असते. पी.आर.ए. मुळे गावातील नागरिकांच्या याच पिढीजात अनुभवाचा सन्मान होतो. केवळ कागदी घोडे नाचवण्याचे हे काम नसून, शेताच्या बांधावर, मंदिरात किंवा चावडीवर बसून गावकऱ्यांनी स्वतःच्या भविष्याचा लिहिलेला हा एक जाहीरनामा असतो. यात तांत्रिक गुंतागुंतीपेक्षा 'माणुसकी' आणि 'परस्पर संवाद' यांना अधिक महत्त्व दिले जाते, ज्यामुळे विकासाची उद्दिष्टे सहज आणि शाश्वतपणे साध्य करता येतात. पी.आर.ए. ची प्रमुख वैशिष्ट्ये आणि जीवनशैलीचा वेध मैत्रीपूर्ण संवाद आणि विश्वासाचे नाते. कोणतेही काम सुरू करण्यापूर्वी नागरिकांमध्ये मिसळणे आणि त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे ही पी.आर.ए. ची पहिली पायरी आहे. ग्रामस्थ हे गावातील सर्वात मोठे संसाधन आहेत. प्रकल्पाचे काम करणारे प्रतिनिधी जेव्हा गावकऱ्यांमध्ये मिसळून त्यांच्यासारखेच होतात, तेव्हाच गावकऱ्यांच्या मनातली खरी स्वप्ने आणि भीती बाहेर येते. ही जवळीक निर्माण करण्यासाठी महिला आणि पुरुषांच्या सोयीनुसार बैठकांचे आयोजन केले जाते.



**गावाचा जिवंत नकाशा** - हा नकाशा केवळ जमिनीवर आखलेल्या रेषा नसतात, तर ते गावाचे हृदय असते. गावातील घरे कुठे आहेत, रस्ते कसे आहेत, शाळा, अंगणवाडी, विहिरी आणि सार्वजनिक ठिकाणे कुठे आहेत, याची सविस्तर मांडणी गावकरी जमिनीवर रांगोळी किंवा दगडांच्या सहाय्याने करतात. हा नकाशा पाहिल्यावर कोणत्या भागात सोयी-सुविधांची कमतरता आहे आणि कुठे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे, याची स्पष्ट कल्पना येते.





**काळाच्या पाऊलखुणा** - गावाचा स्वतःचा एक स्वभाव असतो, जो त्याच्या इतिहासातून उलगडतो.पूर्वी आमचा ओढा बारा महिने वाहायचा किंवा "त्या विशिष्ट वर्षाच्या दुष्काळात आम्ही कसे सावरलो अशा वयोवृद्धांच्या गप्पांमधून गावाचा सामाजिक आणि आर्थिक इतिहास उलगडतो. हा इतिहास जाणून घेतल्यामुळे भविष्यातील योजना आखताना जुन्या चुका टाळता येतात आणि निसर्गाशी नाते पुन्हा जोडता येते.

**निसर्ग आणि मानवाचे नाते** - गावच्या शिवारात कुठे मुरूम आहे, कुठे काळी माती आहे, कोणते क्षेत्र बागायती आहे आणि पावसाचे पाणी कोणत्या उतारावरून वाहून जाते, याचे सूक्ष्म ज्ञान गावकऱ्यांकडे असते. या ज्ञानाचा वापर करून जेंव्हा जलसंधारणाची कामे किंवा वृक्षारोपणाचे आराखडे तयार केले जातात, तेव्हा ते नैसर्गिकरीत्या यशस्वी होतात. जमिनीचा प्रकार आणि पाण्याचे स्रोत यांचा ताळेबंद मांडून भविष्यातील पीक पद्धती ठरवता येते.

**शिवारफेरी** - अनुभवाची पायी वारी गावकऱ्यांच्या सोबतीने शेतापाड्यांतून पायी चालत गावाची पाहणी करणे म्हणजे 'शिवारफेरी'. प्रत्यक्ष जमिनीवर फिरताना मातीची धूप कुठे होतेय, कोणत्या नाल्यावर बंधारा हवा आहे, हे प्रत्यक्ष पाहिल्यामुळे नियोजनात अचूकता येते. या फेरीदरम्यान होणारी चर्चा कोणत्याही चार भिंतींतील चर्चेपेक्षा अधिक वास्तववादी असते.

**हंगामाचे नियतकालिक** - ग्रामीण जीवन निसर्गाच्या चक्रावर अवलंबून असते. कोणत्या महिन्यात हाताला काम नसते, कोणत्या काळात आजारपण वाढते आणि पाण्याचे संकट कधी गंभीर होते, याचा लेखाजोखा 'हंगामाचे नियतकालिक' या साधनामुळे मांडता येतो. स्थलांतराचे प्रश्न असोत वा जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न, या सगळ्याची उकल हंगामाच्या चक्रावरून होते.

**संस्थांचा सहसंबंध** - गावात ग्रामपंचायत, शाळा, बँक, बचत गट अशा अनेक संस्था कार्यरत असतात. या संस्थांचा गावकऱ्यांच्या आयुष्यावर किती प्रभाव आहे आणि त्यांचा एकमेकांशी कसे संवाद - संबंध आहे, हे चपाती डायग्रॅमच्या माध्यमातून मांडले जाते. यामुळे विकासासाठी कोणत्या संस्थेची मदत प्रभावी ठरेल, हे लक्षात येते.

**उपजीविकेचे अवलोकन आणि भविष्यातील संधी** - केवळ रस्ते बांधून विकास होत नाही, तर नागरिकांच्या हाती शाश्वत रोजगार हवा. गावातील कुटुंबांकडे उत्पन्नाची कोणती साधने आहेत, त्यात कोणत्या अडचणी आहेत आणि नवीन कोणते उद्योग (उदा. दुग्धव्यवसाय, प्रक्रिया उद्योग) सुरू करता येतील, याची चाचपणी या प्रक्रियेत केली जाते. अनुभवातून आणि कौशल्यातून रोजगाराच्या नवीन संधी शोधल्या जातात.

## पी.आर.ए. प्रक्रियेत घ्यायची विशेष खबरदारी

**ही प्रक्रिया केवळ एक 'इव्हेंट' न राहता तो एक 'बदलाचा प्रवास' व्हावा यासाठी खालील गोष्टींची काळजी घेणे गरजेचे आहे -**

१. ऐकण्याची तयारी ठेवा - आपण तिथे तज्ज्ञ म्हणून लोकांना शिकवायला गेलो नसून, त्यांच्या अनुभवातून शिकायला गेलो आहोत, ही नम्र भूमिका महत्त्वाची आहे.

२. महिलांचा सक्रिय सहभाग - घरातील चूल आणि पाण्याचे माठ महिलाच सांभाळतात. त्यामुळे गावातील पाण्याच्या आणि आरोग्याच्या प्रश्नांची सर्वाधिक जाण त्यांना असते. त्यांचा सहभाग केवळ उपस्थितीपुरता मर्यादित न ठेवता, त्यांना बोलते करणे गरजेचे आहे.

३. सोपी आणि ओघवती भाषा - जड, तांत्रिक शब्द वापरणे टाळावे. लोकांच्या बोलीभाषेत आणि त्यांना समजेल अशा चिन्हांच्या माध्यमातून संवाद साधल्यास ते अधिक मोकळेपणाने आपले प्रश्न मांडतात.

४. गैरसमज दूर करा - "पी.आर.ए. म्हणजे सरकारी अनुदान मिळवण्याचा मार्ग आहे" किंवा "हे फार अवघड तंत्र आहे" असे गैरसमज लोकांमध्ये पसरू देऊ नका. ही प्रक्रिया सर्वांची आहे आणि सर्वांसाठी आहे हे स्पष्ट करणे आवश्यक आहे

५. पाण्याचा ताळेबंद - महाराष्ट्रासारख्या राज्यात पावसाचे पाणी साठवणे आणि त्याचे नियोजन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. गावात किती पाऊस पडतो आणि किती खर्च होतो, याचा हिशोब मांडणे म्हणजे पाण्याचा ताळेबंद. पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देऊन शेतीसाठी पाण्याचे नियोजन कसे करावे, याचे प्रशिक्षण गावकऱ्यांना यातून मिळते.

६. गोपनीयता आणि सत्यता- काही संवेदनशील प्रश्नांच्या उत्तरांसाठी (उदा. व्यसनाधीनता किंवा स्वच्छता सवयी) 'अनौपचारिक मतदान' किंवा वैयक्तिक चर्चेचा आधार घ्यावा, जेणेकरून खरी आकडेवारी समोर येईल.

पी.आर.ए. अहवाल आणि अंमलबजावणी प्रक्रियेतून आलेली सर्व माहिती, नकाशे आणि गावकऱ्यांच्या अपेक्षा यांचा एक सविस्तर अहवाल तयार केला जातो. हा अहवाल म्हणजे केवळ धूळ खात पडणारी फाईल नसते, तर तो गावाच्या विकासाचा 'कृती आराखडा' असतो. या आराखड्यानुसार प्रकल्पाच्या प्रत्येक टप्प्यावर कामाचा आढावा घेतला जातो. नकाशे कापडावर काढून ग्रामपंचायतीत किंवा सार्वजनिक ठिकाणी लावले जातात, त्याद्वारे नागरिकांना सतत आपल्या उद्दिष्टांची आठवण राहील.

पी.आर.ए. ग्रामीण भागातील सामूहिक शक्तिला जागृत करण्याची एक चळवळ आहे. जेव्हा गावकरी स्वतःच्या बुद्धीने, कष्टाने आणि अनुभवाने गावाचा कायापालट करण्याचा संकल्प करतील तेंव्हा त्याला कोणत्याही बाह्य शक्तिच्या मदतीची गरज उरत नाही. "ग्रामराज्य ते रामराज्य" हे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी पी.आर.ए. हे एक पारदर्शक आणि जिवंत माध्यम आहे. ही प्रक्रिया जेवढी प्रामाणिकपणे राबवली जाईल, तेवढाच गावाचा विकास हा शाश्वत, स्वावलंबी आणि अभिमानास्पद असेल.

पी.आर.ए. प्रक्रियेतून ग्रामस्थांना आपल्या शिवारातील संपत्तीची आणि पिढीजात ज्ञानाची नवी ओळख होईल. त्यांच्या मनात खऱ्या अर्थाने स्वबोध जागृत होईल. हा आत्मिक विश्वास गावकऱ्यांना केवळ शासकीय मदतीवर अवलंबून न राहता स्वतःचे प्रश्न स्वतः सोडवण्यासाठी प्रवृत्त करेल. यातूनच गावाचा आत्मनिर्भर होण्याचा मार्ग अधिक प्रशस्त होऊ शकेल. अशा प्रकारे, जेव्हा नागरिक नियोजनात स्वतः पुढाकार घेतात, तेव्हाच गावाचा विकास हा शाश्वत आणि स्वावलंबी स्वरूपाचा बनतो. हा अनुभव आहे. स्वतःच्या संसाधनांचे योग्य नियोजन आणि सामूहिक श्रमशक्तिचा वापर हीच गावाला खऱ्या अर्थाने समृद्धीकडे नेणारी गुरुकिल्ली ठरेल. लोकसहभागाची ही चळवळ गावाला स्वावलंबनाचा मंत्र देऊन प्रगतीच्या नव्या शिखराकडे घेऊन जाणारी ठरावी यासाठी पी.आर ए वाटाड्याची भूमिका समर्थपणे बजावेल.

# ५. सेवाव्रती

## ५.१ मीरा बडवे - निवांतचा प्रकाशमार्ग....!



पुरेसे शिक्षण नाही, घरातून कुणाचा पाठिंबा नाही, राहण्या-शिकण्याची काही सोय नाही आणि डोळ्यांसमोर शब्दशः अंधार अशा परिस्थितीत असलेल्या तरूण मुलामुलींच्या आयुष्यातील अंधार दूर करण्याचा वसा घेऊन तन, मन आणि धन अर्पून काम करणाऱ्या मीरा बडवे यांचे कार्य अनुकरणीय आहे. 'इच्छा तिथे मार्ग' ही उक्ती सार्थ करणारा त्यांचा प्रवास निवांत नव्हता, मात्र अंधमित्रांना शिकण्याचा, जगण्याचा निवांतपणा देणारा नक्कीच होता.

स्वामी विवेकानंदांनी शिक्षणाची व्याख्या करताना म्हटले की, मनुष्यत्वाचा विकास होणे म्हणजे शिक्षण. पुण्यातील मीरा बडवे आणि त्यांच्या निवांत अंध मुक्त विकासालयाचे कार्यही स्वामी विवेकानंदांच्या शिक्षणाच्या संकल्पनेतील यशस्वी प्रयत्न आहे. मीरा बडवे सुशिक्षित मराठी कुटुंबातील इंग्रजीच्या प्राध्यापिका. अध्यापन आणि घरगुती जबाबदाऱ्या पार पाडत असताना त्यांचे पती आनंद बडवे यांच्यामुळे कोरेगाव पार्कमधील अंधशाळेशी संपर्क आला. आनंद बडवे अंधशाळेला आर्थिक मदत करत असत. व्यवसायाच्या सुरुवातीच्या काळात आर्थिक अडचणी असतानाही आपले पती ज्या संस्थेसाठी काम करतात, ते बघायलाच हवे असे वाटल्याने मीराताईंनी अंध शाळेला भेट देण्याचे ठरवले. शाळेत गेल्यावर मीराताई एका बाजूने जिना चढत होत्या आणि दुसऱ्या बाजूने काही लहान मुले जिना उतरत होती. त्यातील एक चिमुकला मुलगा मीराताईंना धडकला आणि एकदम त्यांना बिलगला. त्याला वाटले की त्याची आई आली आहे. आपल्या आईचा स्पर्श झाला असे वाटून तो रडायला लागला.

आयुष्यात असा एखादा प्रसंग घडतो की त्यामुळे संपूर्ण आयुष्यच बदलून जाते, मीराताईंचे असेच काहीसे झाले. तो चिमुकला त्यांना बिलगून, त्यांना आई समजून रडू लागला आणि मीराताईंच्यासुद्धा डोळ्यातून अश्रुधारा सुरू झाल्या, घरी गेल्यावर त्या पतीला म्हणाल्या, "मला या मुलांसाठी काही तरी करायचं आहे. परंतु केवळ बाहेरून मदत नाही करायची. प्रत्यक्ष तिथे जाऊन काम करायचं आहे." मात्र आपण पैशांसाठी हे काम करणार नाही, त्यातून अर्थार्जन करणार नाही हेदेखील त्यांनी स्पष्ट केले.

आनंद यांनी संसाराची आर्थिक जबाबदारी उचलण्याचे आश्वासन देऊन मीराताईंना संपूर्ण आणि सक्रिय पाठिंबा दिला. त्यानंतर मीरा बडवे नियमितपणे अंधशाळेत जाऊ लागल्या, शिकवण्यात मदत करू लागल्या. मुलांना शिकवताना एकीकडे त्यांचे स्वतःचेही शिक्षण सुरू झाले. त्या ब्रेल लिपी शिकल्या. विशेष दृष्टी लाभलेल्या या मुला-मुलींचे जग त्या जाणून घेऊ लागल्या. त्यांनी विद्यार्थ्यांशी मैत्री केली. कालांतराने त्यांना ते काम चाकोरीबद्ध वाटायला लागले. त्यांनी शिकवण्यासाठी रोज शाळेत जाणे थांबवले, मात्र मदत करत राहिल्या.

अशा प्रकारच्या शाळांना सरकारी नियमांच्या चौकटीत राहून काम करावे लागते. त्यातील एक नियम म्हणजे एखादा विद्यार्थी फक्त अठरा वर्षे पूर्ण होईपर्यंतच अशा शाळेत राहू शकतो. त्यानंतर त्यांचे शिक्षण खुंटते. अनेकदा पालकांनी मुलांना शाळेत घालायला इतका उशीर केलेला असतो की, अठरा वर्षे पूर्ण होईपर्यंत त्याचे फारसे शिक्षण होत नाही. त्यामुळे अठराव्या वर्षानंतर काय करायचे हा यक्षप्रश्न त्यांच्यापुढे उभा राहतो. अशा प्रश्नांची उत्तरे शोधतानाच 'निवांत अंध मुक्त विकासालया'चा जन्म झाला. 'निवांत' हे बडवे कुटुंबियांच्या घराचे नाव. एकदा एक मुलगा अचानक त्यांच्या घरी, 'निवांत'मध्ये आला. त्याचे नाव सिद्धार्थ गायकवाड. सिद्धार्थचे पालक त्याची कोणतीच जबाबदारी घेऊ शकत नव्हते. कुणाच्या तरी ओळखीतून सिद्धार्थ अंधशाळेत दाखल झाला होता. तिथे शिक्षण घेत होता. नियमानुसार अठरा वर्षे पूर्ण झाल्यावर त्याला शाळा सोडावी लागली. तेव्हा त्याचे नववीपर्यंतचे शिक्षण झाले होते. अचानक रस्त्यावर आल्याने तो भांबावला होता. तीन दिवस त्याने इथे-तिथे, कधी पुलावर राहून, कधी आणखी कुठे असे काढले, आणि मग मीराताईंचा पत्ता शोधत तो त्यांच्या घरी गेला. मीराताईंनी केवळ एक हाडाचा सापळा दिसला. प्रथम त्यांनी त्याला खाऊ-पिऊ घातले. दिलासा दिला. शिक्षक म्हणून त्यांना खूप वाईट वाटले. आणि याला शिकवण्याची जबाबदारी आता आपलीच आहे असे त्यांच्या मनाने ठरवले. कारण सिद्धार्थला स्वतःच्या पायांवर उभे करायचे असेल तर शिक्षण हा एकमेव पर्याय होता.

देवाने आपल्याला या मुलाची आई होण्याची संधी दिली आहे, तर आता आपण मागे हटायचे नाही असा निश्चय मीराताईंनी केला. त्यांच्या कुटुंबियांनी त्यांना साथ दिली, सिद्धार्थने त्यांच्यावर पूर्ण विश्वास ठेवला, आणि मीराताईंच्या कामाला सुरुवात झाली. त्याची दहावीची तयारी करून घ्यायची म्हणून मीराताईंना स्वतःला गणित, विज्ञान आणि इतर विषय शिकावे लागले. मीराताईंच्या प्रयत्नामुळे सिद्धार्थ दहावी उत्तीर्ण झाला. सिद्धार्थ आयुष्यात स्थिरस्थावर झाला आहे. त्याचे लग्न झाले आहे. त्याला दोन मुले आहेत. सिद्धार्थमुळे 'निवांत'चे दार उघडले आणि त्यातू अनेक जण प्रकाशाच्या शोधात आत आले. सिद्धार्थच्या अनुभवातून आणि मीराताईंवरील विश्वासामुळे त्यानंतरच्या वर्षी ७० विद्यार्थी निवांतमध्ये आले 'कितीही अडचणीत असलात तरी इथे या, इथे तुम्हाला नक्की मदत मिळेल' हे सिद्धार्थचे म्हणणे मुलांना पटले, आणि ती हक्काने निवांतच्या आसऱ्याला आली.

निवांतचा विकास होत होता, अनेकांना आधार मिळत होता. परंतु ही वाट सोपी नक्कीच नव्हती. पहिली गोष्ट म्हणजे हे अंध विद्यार्थी दहावीनंतर पुढे शिकतील यावर समाजाचा विश्वास नव्हता. मुलांची इच्छा होती, कष्टाची तयारी होती परंतु अडचणी खूप होत्या. मुलांना वेगवेगळ्या क्षेत्रांत करिअर करण्याची इच्छा होती. कुणाला कॉमर्स करायचे होते, तर कुणाला लायब्ररी सायन्स. कायद्याच्या शिक्षणापासून ते योग शिक्षणापर्यंत करिअरच्या असंख्य वाटा निवांतमध्ये मुलांनी धुंडाळल्या आणि त्या प्रयत्नांत ते यशस्वी सुध्दा झाले.

मुलांच्या क्षमतांविषयी शंका घेतली जायला नको म्हणून मीराताई शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला महाविद्यालयाच्या प्राचार्यांना, विद्यापीठाच्या कुलगुरूंना, विभाग प्रमुखांना, इतर अधिकाऱ्यांना भेटायच्या. ही मुले काय करू शकतात, त्यांच्या मर्यादा काय आहेत हे त्यांना समजून सांगायच्या, त्याच्याच जोडीला ही मुले माझी आहेत आणि यांच्या यशापयशाची जबाबदारी माझी आहे. अशी ग्वाही द्यायच्या. शैक्षणिक वर्ष संपताना मीराताईंना सन्मानाने बोलावले जायचे, आणि त्यांचे आणि त्यांच्या यशस्वी, गुणी विद्यार्थ्यांचे खूप कौतुक व्हायचे. त्यानंतरच्या वर्षी निवांतची मुले आत्मविश्वासाने आणखी वेगवेगळ्या शाखांमध्ये प्रवेश घ्यायची. त्यातही यशस्वी व्हायची. जणू 'अनंत आमुची ध्येयासक्ती, अनंत अन् आशा' हे त्यांचे ब्रीदवाक्य आहे.

उच्च शिक्षण घेणाऱ्या अंध विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याची आवश्यकता मीराताईंना जाणवायला लागली. श्राव्य पुस्तकांबरोबर (ऑडिओ बुक्स) ब्रेल लिपीमधील पुस्तके तयार करणे आवश्यक होते. सुरुवातीला ब्रेलमधील पुस्तके हाताने लिहावी लागत असत. पुढे दहा वर्षांनी निवांतमध्ये ब्रेल प्रिंटर आला त्यामुळे काम जरा सोपे झाले. पाठ्यपुस्तके, शैक्षणिक पुस्तकांबरोबरच ललित साहित्याची पुस्तकेदेखील ब्रेलमध्ये आणण्यात आली. महाराष्ट्रात निवांतच्या पुढाकारातून आणि प्रयासातून ब्रेलमधील पुस्तकांची लायब्ररीही सुरू झाली आहे.







स्वलेखन' प्रकल्प

अंध विद्यार्थ्यांना परीक्षेच्या वेळी लेखनिकाची गरज लागते. अनेक डोळस व्यक्ती स्वतःहून लेखनिक म्हणून काम करण्यासाठी येतात, नाही असे नाही. परंतु काही वेळा त्यांचे प्रतिकूल अनुभवही येतात. त्याचाही फटका विद्यार्थ्यांना बसतो. यातून मुलांची सुटका व्हावी म्हणून आनंद बडवे आणि त्यांची कन्या उमा बडवे यांनी 'स्वलेखन' हे अप्लिकेशन तयार केले आहे. त्याचा वापर करून मुलांना त्यांचे बोलणे टाइप करता येते. भविष्यात याचा वापर परीक्षेसाठी होऊ शकतो. त्यामुळे मुलं संपूर्णपणे आत्मनिर्भर होतील.

निवांत अंध मुक्त विकासालयात उच्च शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अशा सर्वांगीण विकासाचा विचार केला जातो. मीराताई आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या अथक, अविरत आणि पायाभूत कार्यामुळे हे विद्यार्थी नृत्य, गायन, संगणक शास्त्र, बेकरी-कन्फेक्शनरी, कायदा, लायब्ररी सायन्स, बीसीए, कॉमर्स इ. या क्षेत्रांत कार्यरत आहेत. निवांतमुळे गेल्या २७-२८ वर्षांत साडेतीन हजारांहून जास्त अंध मित्रांचे जीवन सावरले गेले आहे. मीराताई त्याचे सगळे श्रेय विद्यार्थ्यांना देतात. त्यांच्या मते त्यांनी निवांतसाठी शंभर टक्के प्रयत्न केले असतील तर मुलांनी तीनशे टक्के केले. त्यामुळे यशामध्ये त्यांचा वाटा मोठा आहे.

### समाजाकडून कौतुक

मीराताईच्या निःस्वार्थी आणि निरलस सेवेची दखल अनेक संस्थांनी घेतली आहे. अनेक मानाचे पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. निवांतने घडवलेले, समाजाला काही देण्याची आस असणारे सुजाण नागरिक ही मीराताईच्या कामाला मिळालेली खरी पोचपावती आहे.

"(वरील तपशील बाया कर्वे स्त्री अभ्यास केंद्र, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, पुणे यांच्या 'कर्त्या करवित्या' या पुस्तकातून घेतला आहे.)"

## ५.२ पद्मजा गोडबोले - स्वमग्न मुलांची 'प्रसन्न' धडपड...!



स्वमग्नता म्हणजे काय हे समाजाला आणि स्वमग्न मुलांच्या पालकांनाही माहीत नव्हते अशा काळात त्या मुलांचे शिक्षण हे आपले कार्यक्षेत्र असे ठरवून पद्मजा गोडबोले यांनी त्या कार्याला स्वतःला वाहून घेतले. 'प्रसन्न ऑटिझम सेंटर'च्या माध्यमातून त्यांनी अशा मुलांना प्रतिष्ठा आणि त्यांच्या पालकांना दिलासा मिळवून दिला. पद्मजाताईच्या निधनानंतरही त्यांनी आखून दिलेल्या मार्गावरून संस्थेचे काम निरंतर सुरू आहे. मूल विशेष जन्माला येते यात कुणा एकट्याचा दोष नसतो. त्याची सगळी कारणेदेखील अद्याप कळलेली नाहीत. मुलाच्या क्षमतानुसार शिक्षण देऊन त्याला बरेचसे स्वावलंबी बनवता येते. यावर लवकर निदान करून मुले शिक्षणाच्या प्रवाहात यावीत यासाठी प्रसन्नमध्ये सगळ्यांची धडपड सुरू असते.

आर्थिकदृष्ट्या मागसलेल्या, शारीरिकदृष्ट्या अपंग अशा गरजू मुला-मुलींचे शिक्षण, संगोपन, व्यावसायिक प्रशिक्षण यासाठी गेली अनेक वर्षे भारतात मोठे काम सुरू आहे. परंतु शारीरिक दुर्बलतांबरोबरच बौद्धिक दुर्बलता, भावनिक अक्षमता ही देखील एक समस्या आहे, आणि अशा मुलांसाठी स्वतंत्र शाळा, प्रशिक्षण असले पाहिजे, या मुलांनाही स्वावलंबी बनवले पाहिजे ही जाणीव अगदी अलीकडच्या काळापर्यंत भारतीय समाजात नव्हती. पद्मजा गोडबोले यांना मात्र गतीमंदत्व, मतीमंदत्व, स्वमग्नतेमुळे अध्ययन अक्षम असलेल्या मुलांच्या (त्यांच्यासाठी आता 'विशेष मुले' ही संज्ञा वापरली जाते) गरजा सुमारे चाळीस-पंचेचाळीस वर्षांपूर्वी पहिल्यांदा जाणवल्या. त्याला कारण ठरले त्यांचे इंग्लंडमधील वास्तव्य. विवाहानंतर त्या पतीसोबत इंग्लंडला गेल्या. त्या आधी त्यांनी पुण्यात बी.एड. हा अभ्यासक्रम पूर्ण केला होता. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात काम करायचे हे त्यांनी ठरवले होतेच. इंग्लंडमध्येही त्यांनी शिक्षिकेची नोकरी केली. परंतु त्यांना नोकरी मिळाली ती विशेष मुलांच्या शाळेत. त्या शाळेत काम करताना पद्मजाताईंना विशेष मुलांच्या समस्या, त्या समस्यांचे स्वरूप, त्यावर मात करून त्यांना अधिकाधिक सक्षम बनविण्यासाठी उपलब्ध असलेले विविध मार्ग यांचा जवळून परिचय झाला. त्यांना त्या क्षेत्रात काम करण्यात रुची वाटू लागली.त्यानंतर कॅनडात विशेष मुलांसाठीच्या अध्यापन पद्धतीचा अभ्यासक्रमही त्यांनी पूर्ण केला. भारतात परतल्यावर त्यांनी एम.एड. या पदव्युत्तर अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला. तेव्हा अभ्यासक्रमाचा भाग म्हणून असलेल्या संशोधन प्रकल्पासाठी त्यांनी 'विशेष मुलांसाठी राबविण्याच्या अध्यापन पद्धती व विषय' यासंबंधी संशोधन केले. इंग्लंडमध्ये घेतलेल्या अनुभवांतून आणि एमएडसाठीच्या संशोधनातून विशेष मुलांसाठी काम करण्याचा त्यांचा निर्धार पक्का होत गेला.

या निर्धाराला १९९०च्या सुमाराला मूर्त रूप आले, आणि काही समविचारी मित्रांच्या मदतीने त्यांनी 'प्रिझम फाउंडेशन' या संस्थेची स्थापना केली. आपला पुढचा प्रवास सोपा नाही याची जाणीव पद्मजाताईंना अगदी सुरुवातीपासून होती. कारण अध्ययन अक्षमता असलेली मुले आपल्या समाजाचा एक अविभाज्य भाग आहेत, त्यांची अवस्था हा आजार नाही, तर थोड्या प्रयत्नांनी त्यांनादेखील जास्तीत जास्त चांगले आयुष्य जगता येऊ शकते हे विशेष मुलांच्या पालकांनादेखील समजावून सांगणे अवघड होते. अशा मुलांशी संपर्क आलेला नाही त्या सर्वसामान्य माणसांना तर ते कळणे अशक्य होते.

प्रिझम फाउंडेशनच्या शाळेची 'नापासांची शाळा', 'वेड्यांची शाळा' अशी संभावना होत असे. त्याकडे दुर्लक्ष करून पद्मजाताई आणि त्यांचे सहकारी काम करत राहिले. तिथे येणाऱ्या सगळ्या मुलांची अक्षमता एकाच प्रकारची नव्हती. काहींची प्रगती अगदी संथ होती, काहींना भाषा कळत नसे. काहींना गणित कळत नसे. काही एका जागी स्थिर बसू शकत नसत. परंतु काही मुले मात्र त्याहीपेक्षा आणखी वेगळी होती असे पद्मजाताईंच्या लक्षात आले. त्यातले कुणी अजिबात इतरांशी बोलत नसे, कुणाची स्मरणशक्ती चांगली होती, तथापि त्याला दुसऱ्याच्या नजरेला नजर देऊन बोलता यायचे नाही, कुणी नुसतीच वाळलेली पाने गोळा करत बसे, तर कुणी एखादा दोरा हातात घेऊन तासनतास त्याच्याशी खेळत बसे. त्यांचे निरीक्षण केल्यावर पद्मजाताईंना ही मुले 'ऑटिस्टिक' म्हणजे स्वमन असू शकतील का? अशी शंका आली. कारण कॅनडातल्या त्यांच्या अभ्यासक्रमात त्यांना ऑटिझमविषयी माहिती मिळाली होती. स्वमग्न मुलांसाठी स्वतंत्रपणे काम केले पाहिजे हे लक्षात आल्यावर पद्मजाताईंनी भारतात स्वमग्न मुलांसाठी काय प्रयत्न सुरू आहेत हे शोधण्याचा प्रयत्न केला. अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये त्या सहभागी झाल्या. नॅशनल ऑटिस्टिक सोसायटीचे सभासदत्व त्यांनी घेतले. ऑटिझमच्या क्षेत्रात काम करणाऱ्या अमेरिकेतील संस्थांशी संपर्क केला. या प्रश्नाची व्याप्ती आणि त्याची गरज लक्षात

घेऊन त्यांनी ऑटिस्टिक मुलांसाठी स्वबळावर काम करण्याचे ठरवून ५ जून २००० मध्ये स्वतःच्या राहत्या घरात प्रसन्न ऑटिझम सेंटरची स्थापना केली.

ऑटिझमविषयी अज्ञान आणि अनास्था होती. त्यामुळे पद्मजाताईंना गावोगावी जाऊन कार्यशाळा घेऊन स्वमग्नता ही काय अवस्था आहे, ती कशी ओळखायची, स्वमग्न मुलांना कशा प्रकारचे शिक्षण आवश्यक आहे हे लोकांना समजावून सांगावे लागले. हळूहळू समाजात स्वमग्नतेविषयी जाणीव निर्माण व्हायला सुरुवात झाली. त्यानंतरचे काम होते स्वमग्न मुलांना शिकविण्यासाठी शिक्षक तयार करण्याचे. पद्मजाताईंनी तसे विशेष प्रशिक्षण शिक्षकांना दिले.

या कामासाठी सरकारी अनुदान न घेता पद्मजाताईंनी सेंटरची पायाभरणी केली. इथे येणाऱ्या प्रत्येक मुलाच्या गरजा वेगळ्या असतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर शिक्षक आणि मदतनीस लागतात. विद्यार्थी-शिक्षक हे गुणोत्तर इथे सर्वसामान्य शाळेपेक्षा जास्त असते. एखाद्या मुलाला प्रवेश दिला की, त्याच्या सवयींचा, स्वभावाचा, क्षमतांचा व्यवस्थित अभ्यास करून त्याच्यासाठी दिवसभरात कायकाय करायचे याचे वेळापत्रक ठरवले जाते. मुलाच्या कलाने, सतत त्याला एकेक गोष्ट दाखवत, करायला लावत शिकवले जाते. काही मुलांना चपला कशा घालणे, दार उघडणे, चूळ भरणे, स्वतःच्या हाताने खाणे इतक्या साध्यासाध्या गोष्टीदेखील शिकवाव्या लागतात. मात्र त्यात शिक्षकांना कमालीची चिकाटी ठेवावी लागते. कारण सतत एखादी गोष्ट बघून त्याचे अनुकरण करतच ही मुले शिकतात. सकाळी साडेनऊ ते दुपारी साडेतीन अशी प्रसन्न ऑटिझम सेंटरच्या शाळेची वेळ असते. त्या दरम्यान प्रार्थना, शाळेचे तास, विश्रांती, कलाकुसरीचे वर्ग, आवश्यकतेनुसार योगासने, स्पीच थेरपी, ऑक्युपेशनल थेरपी अशा अनेक गोष्टी केल्या जातात. आहारतज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार बनवलेला चौरस आहारही मुलांना दिला जातो.

इतर शाळांसारखी अधूनमधून परीक्षा घेऊन पालकांना प्रगतीपुस्तक पाठवायचे असे इथे करून चालत नाही. इथे प्रत्येक मुलाच्या दैनंदिन नोंदी कराव्या लागतात. दर आठ-पधरा दिवसांनी मुलाची प्रगती पालकांना सांगून त्याची आणखी प्रगती होण्यासाठी काय केले पाहिजे ते सांगावे लागते.





पहिल्या दहा-बारा वर्षांत संस्थेची घडी व्यवस्थित बसल्यानंतर, चालू असलेल्या प्रयत्नांना यश मिळत आहे हे लक्षात आल्यावर प्रसन्न ऑटिझम सेंटरच्या कामात पूर्व-व्यावसायिक प्रशिक्षण केंद्राची भर पडली. १ ऑगस्ट २०१२ रोजी सुरू झालेल्या या प्रशिक्षण केंद्रात १३ ते १७ वर्षे वयाच्या मुलांना विशेष शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली शुभेच्छापत्रे, पाकिटे, मेणबत्त्या तयार करणे, आटाचक्की चालवणे असे व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते. अनेक संस्था आणि व्यक्ती अशा वस्तू विकत घेतात. अशा कौशल्यांमुळे ही मुले थोडीफार स्वावलंबी होतील हा त्यामागचा विचार आहे.

स्वमग्नतेची जनजागृती आणि स्वमग्न मुलांना स्वावलंबी करणारे शिक्षण देण्याच्या प्रयत्नांतून 'लार्क', 'बेन्यू' आणि 'सृजनरंग' या आणखी तीन संस्था कार्यरत झाल्या आहेत. त्यांपैकी 'लार्क' संमिश्र अपंगांसाठी काम करते. 'बेन्यू' ही संस्था पालक आणि शिक्षक यांना प्रशिक्षण देते. शालेय अभ्यासाव्यतिरिक्त प्रत्येक मुलाच्या अंगी इतर अनेक कलागुण असतात त्यामुळे कलेच्या माध्यमातून व्यक्त होणाऱ्या मुलांसाठी 'सृजनरंग' काम करते. प्रसन्नच्या शिक्षणपद्धतीच्या यशस्वितेची काही उदाहरणे विशेष उल्लेखनीय आहेत.

राघव कृष्णन या विद्यार्थ्याने सलग १३ तास १२ मिनिटे पोहण्याचा विक्रम केला. आशुतोष रमेश साळुंखे हा मुलगा ६७ टक्के गुण मिळवून इ. दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाला, ही प्रसन्न ऑटिझम सेंटरसाठी अभिमानाची आणि आनंदाची गोष्ट होती. त्यानंतर दोन वर्षांनी तो बारावीची परीक्षादेखील उत्तीर्ण झाला. त्याला लेखनिक घेण्याची मुभा असतानाही त्याने स्वतःच्या हाताने उत्तरपत्रिका लिहिल्या हे देखील मोठे यशच मानावे लागेल. हार्मोनियम वादनाच्या चार परीक्षाही तो उत्तीर्ण झाला आहे.

स्वमग्न मुलांसाठी काम करणाऱ्या भारतातल्या अगदी सुरुवातीच्या संस्थांपैकी एक 'प्रसन्न ऑटिझम सेंटर' असल्यामुळे महाराष्ट्राच्या आणि देशाच्या विविध भागांतून पालक इथे मार्गदर्शनासाठी येत असत. ऑस्ट्रेलिया, अमेरिका, इंग्लंड, सिंगापूर या देशांतूनदेखील अनेकजण इंटरनेटद्वारे संपर्क करतात. सुदान या देशातल्या दोन जुळ्या मुलांच्या पालकांनी त्यांच्या पाल्यांना  प्रसन्नच्या शाळेत प्रवेश घेतला होता. सध्या प्रसन्न ऑटिझम सेंटरमध्ये वय वर्ष तीन ते सतरा या वयोगटातली एकूण ४३ मुले शिक्षण घेत आहेत. तिथे मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तिन्ही भाषांमधून शिकवले जाते. पंचवीस वर्षे अथक परिश्रम घेऊन पद्मजाताईंनी प्रसन्न ऑटिझम सेंटरचा पाया भरभरक्कम केला. अनेक दानशूर देणगीदार संस्थेशी जोडले गेले त्यामुळे संस्था नवनवे उपक्रम करू शकली.

३  फेब्रुवारी २०१५ ला  पद्मजाताईंचे निधन झाले. अनेकदा संस्थापकांनंतर संस्थेच्या कामाची गती मंदावते, किंवा त्यात काही अडचणी निर्माण होतात. प्रसन्नमध्ये मात्र तसे झाले नाही याचे कारण पद्मजाताईंचे काम पाहून त्यांच्या स्नुषा साधनाताई गोडबोले सुरुवातीपासून त्यांच्याबरोबर या कामात सामील झाल्या होत्या. मानसशास्त्रतज्ज्ञ असलेल्या साधनाताईंनी प्रिझमची स्थापना, विस्तार आणि प्रसन्नची उभारणी हा प्रवास प्रत्यक्ष पाहिला होता. प्रसन्नचे काम तर त्यांच्या राहत्या घरातच सुरू झाल्यामुळे त्यांनी सुरुवातीला स्वयंसेवक म्हणूनही तिथे काम केले. आणि मग कामाची गरज, आवाका बघून त्यात पूर्ण वेळ काम करायचे ठरवले. सासू-सून यांच्यातील एक अनोखे नाते प्रसन्नच्या रूपाने पाहायला मिळते.

सध्या प्रसन्न ऑटिझम सेंटरचा कार्यभार सांभाळून त्या समाजात ऑटिझमविषयी जागृती करण्याचे कामही करत असतात. कारण अजूनही याविषयी समाजात अज्ञान किंवा गैरसमज आहेत. अनेक शैक्षणिक आणि सामाजिक संस्थांनीसुद्धा पद्मजाताईंच्या आणि साधनाताईंच्या कार्याचा यथोचित गौरव केला आहे. गौरव मिळाले म्हणजे काम संपले असे नाही, तर कामाची जबाबदारी आणखी वाढली आहे याची जाणीव साधनाताईंना आहे. समाजाचा आजही स्वमग्नतेकडे आणि स्वमग्न व्यक्तींकडे पाहण्याचा दृष्टिकोन पुरेसा बदललेला नाही याची खंत या क्षेत्रात काम करणाऱ्यांना वाटते.  प्रत्येक स्वमग्न मुलामध्ये एक तरी गुण किंवा कला असतेच. ती शोधून, विकसित करून त्या मुलाला सन्मानाचे स्वावलंबी आयुष्य जगण्याची क्षमता देणे शक्य असते हे प्रसन्न ऑटिझम सेंटरने त्यांच्या कामातून सिद्ध केले आहे. आजवर मदतीचे अनेक हात प्रसन्नला मिळाले, तसेच पुढेही मिळत राहतील आणि स्वमग्न मुलांचे भवितव्य उज्ज्वल होईल अशा विश्वासावर साधनाताई आणि त्यांचे सहकारी पद्मजाताईंनी आखून दिलेल्या वाटेवर निष्ठेने वाटचाल करत आहेत.

"(वरील तपशील बाया कर्वे स्त्री अभ्यास केंद्र, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, पुणे यांच्या 'कर्त्या करवित्या' या पुस्तकातून घेतला आहे.)"

# ६. सेवा वार्ता

## ६.१ सेवा है यज्ञकुंड सेवातरंग २०२६ आढावा



स्वयंसेवी संस्थांचे मुख्य आधारस्तंभ असलेल्या सेवावर्धिनीच्यावतीने पुण्याजवळील वारजे येथील बायफ भवनात दोन दिवसीय 'सेवातरंग' ही राज्यस्तरीय परिषद पार पडली. संवादाचा सेतू साधत विविध विषयावर या परिषदेत विचारांचे आदानप्रदान झाले. या परिषदेचा थोडक्यात आढावा...

माहिती आणि ज्ञानाची देवाणघेवाण, एकमेकांशी उत्तम समन्वय आणि संस्थात्मक क्षमता बांधणीद्वारे स्वयंसेवी संस्थांना बळकटी देणे हा महत्त्वाचा उद्देश घेऊन सेवावर्धिनीने 'सेवा तरंग २०२६' या दोन दिवसीय राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदेसाठी एकूण १२६ स्वयंसेवी संस्थांनी नोंदणी केली होती. त्यामध्ये राज्यभरातील सुमारे २५ जिल्ह्यांतील १०६ स्वयंसेवी संस्थांनी सक्रिय सहभाग घेतला. उल्लेखनीय बाब म्हणजे या परिषदेत सुमारे १६२ प्रतिनिधी उपस्थित होते.

### उद्घाटन सत्र

उद्घाटन समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून केपीआयटीचे सहसंस्थापक रवी पंडित उपस्थित होते. परंपरेनुसार त्यांनी भारत मातेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करून परिषदेचे उद्घाटन केले. उद्घाटन सत्रात सेवेची भावना आणि सामाजिक विकासाप्रती असलेली बांधिलकी दर्शविणारे प्रेरणादायी ध्येयगीत सादर करण्यात आले.

कार्यक्रमास पंडित यांच्यासह सेवावर्धिनीचे कार्यकारी अध्यक्ष सुहास लुंकड, संयुक्त कार्यकारी अध्यक्ष शैलेंद्र कावडे, सचिव सोमदत्त पटवर्धन, कार्यकारी समिती सदस्य विक्रम पंडित, मुख्य कार्यकारी अधिकारी गिरीश देगावकर उपस्थित होते.

सचिव पटवर्धन यांनी प्रास्ताविकात सेवावर्धिनीच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. संस्था प्रशिक्षणासोबत सामाजिक संस्थांच्या क्षमता बांधणीसाठी प्रत्यक्ष प्रकल्प राबविते. सेवावर्धिनी ५०० हून अधिक भागीदार संस्थांना सहकार्य करत असून जलसंधारण, 'एक मूठ धान्य' अभियान, अक्षय ऊर्जा आणि ग्रामीण विकास या क्षेत्रात कार्यरत असल्याचे पटवर्धन यांनी प्रास्ताविकात स्पष्ट केले.

सेवावर्धिनी म्हणजे "मातृ संस्था" असे सांगत लुंकड यांनी सेवावर्धिनीच्या कार्याचे महत्त्व विषद केले. तळागाळातील संस्थांना आधार देण्याचे कार्य सेवावर्धिनी करत असल्याचे त्यांनी सांगितले. देशभरात सुमारे ४० टक्के देणग्या मध्यमवर्गीयांकडून येतात असे सांगून ग्रामीण भागातील स्वयंसेवी संस्थांसमोरील आव्हाने, प्रश्न सोडविण्यासाठी देणगीदारांचा सहभाग वाढविण्यावर भर देण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

रवी पंडित यांनी शाश्वत विकास पद्धतींच्या महत्त्वावर भर दिला. त्यांनी स्वयंसेवकांच्या "मी अधिकारी नाही, तर कार्यकर्ता आहे" या वृत्तीचे कौतुक केले. उद्घाटन सत्रानंतर विविध केस स्टडीचे सादरीकरण करण्यात आले. या सत्रात अनेक संस्थांनी त्यांच्या यशस्वी प्रयोगांचे सादरीकरण केले. यामध्ये सुमारे ५५ हजार महिलांसोबत शाश्वत उपजीविकेचे काम करणाऱ्या बीड येथील नवचेतना विकास केंद्राच्या मनिषा घुले यांनी सादरीकरण केले.

याशिवाय विविध सामजिक, सेवा विषयांवर तपशिलाने माहिती देण्यात आली.

- श्री. प्रसाद शिरसीकर (सेवा इंटरनॅशनल) - शालेय विद्यार्थ्यांमध्ये बचतीची सवय लावणारा "जादूई गुल्लक" उपक्रम.
- श्री. डॉ. तुषार भेळके (सेवा आरोग्य फाउंडेशन) - सामुदायिक आरोग्य उपक्रम.
- श्री. दीपक आव्हाड (सेवावर्धिनी) - सौर ऊर्जेवर आधारित सिंचन आणि आदिवासी विकास.
- श्रीमती. विद्यागौरी कुलकर्णी (सेवावर्धिनी) - 'वर्षाकोष' प्रकल्पांतर्गत जलसंधारण.

दुसऱ्या दिवसाची सुरुवात संदीप शौचे यांच्या सत्राने झाली. त्यांनी सेवावर्धिनीचे नेटवर्किंग आणि इन्क्यूबेशन प्लॅटफॉर्म म्हणून असलेले कार्य स्पष्ट केले. त्यांनी प्रशिक्षण, संस्थात्मक मूल्यांकन, संयुक्त प्रकल्प, संसाधन एकत्रीकरण आणि निधी उभारणी या संस्थेच्या पाच मुख्य घटकांची माहिती दिली.

आर्थिक व्यवस्थापन आणि निधीचा वापर या सत्रात स्वयंसेवी संस्थांमधील आर्थिक पारदर्शकता, सीएसआर **(CSR)** नियम, एफसीआरए **(FCRA)** कायदे आणि लेखापरीक्षण या विषयांवर विविध तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. सीए शशांक पत्की आणि सीए सोमदत्त लाड यांनी आर्थिक शिस्तीचे महत्त्व पटवून दिले.

### ग्रामीण विकासासाठी तंत्रज्ञान

मुंबईच्या सी-तारा **(C-TARA)** विभागातील तज्ज्ञांनी ग्रामीण समस्या सोडविण्यासाठी योग्य तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा, यावर मार्गदर्शन केले. डॉ. आनंद राव यांनी सांगितले की, तंत्रज्ञान केवळ उद्योगांपुरते मर्यादित न राहता ते ग्रामीण जीवन सुलभ करण्यासाठी वापरले पाहिजे.

### समारोप सत्र

दोन दिवसीय कार्यशाळेच्या समारोप सत्रात पद्मश्री डॉ. हिम्मतराव बावस्कर यांच्याशी संवाद साधण्यात आला. त्यांनी आपल्या सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील प्रवासाचे प्रेरणादायी अनुभव सांगितले. पश्चिम क्षेत्र सह सेवा प्रमुख सुहास भागवत यांनी समाज परिवर्तनासाठी सामूहिक जबाबदारीवर भर दिला.

सेवा तरंग २०२६ हे स्वयंसेवी संस्थांसाठी शिकण्यासाठी आणि एकमेकांशी जोडले जाण्यासाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरले. अशा उपक्रमांच्या माध्यमातून सामाजिक क्षेत्रातील सहयोग अधिक दृढ करण्यासाठी सेवावर्धिनी भविष्यातही प्रयत्नशील राहील, असे या परिषदेच्या माध्यमातून स्पष्ट करण्यात आले.



# सेवावार्ता

## संपादक मंडळ

श्री. सोमदत्त पटवर्धन - कार्यवाह

श्री. विक्रम पंडित – कार्यकारिणी सदस्य

श्री. गिरीश देगावकर - मुख्य कार्यकारी अधिकारी

सौ. गिरीजा सिरशीकर - महाव्यवस्थापक

श्रीमती. अंजली तागडे - कार्यकर्ता

सेवावर्धिनी

सेवावर्धिनी - एक विश्वासार्ह सहकारी